**नि.क्र.०१ वर आदेश** (१) संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक **१८०/२०१७**
आसीफ इर्शाद अली हाफीज वि. इफ्त खान + ०५

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०४ अन्वये फिर्याद**
**निशाणी क्रमांक ०१ वर आदेश**

(पारीत केल्याचा दिनांक **०१.०४.२०१९** )

(सी.एन्.आर.क्रमांक:एम्.एच्.आर.जी.०९०००३०१२०१७)

**०१.** फिर्यादपत्रक, फिर्यादीची ***फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २००*** ची तपासणी विचारात घेतली. फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम्. डी. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

**०२.** फिर्यादी व फिर्यादीच्या शपथेवर नोंदवलेल्या पडताळणीवरून प्रथमदर्शनी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरसरणार्थ *भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३८८, ३२३, ५०४, ५०६ सह वाचनीय कलम ३४* अन्वये दंडनीय गुन्हा केल्याचे दिसते. म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १९०(१)(अ) नुसार गुन्ह्याची दखल घेण्यात येते. आरोपींविरूद्ध आदेशिका जारी करण्यास पुरेसे कारण आहे अशी माझी धारणा झाली आहे. म्हणून खालील आदेश पारीत करणे न्यायाचे होईल.

**आ दे श**

(अ) आरोपींविरूद्ध *फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०४* अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३८८, ३२३, ५०४, ५०६ सह वाचनीय कलम ३४ अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी आदेशिका जारी करण्यात येते.

(आ) फिर्यादीने आरोपींना देण्यासाठी फिर्यादपत्रकाच्या प्रती दिल्यावर त्यांना न्यायालयात हजर राहण्यासाठी समन्स काढावे.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**स्थळ : रोहा.**
**दिनांक : ०१.०४.२०१९.**